# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**Savitribai Phule Pune University**
*(Formerly University of Pune)*

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
दूरध्वनी क. (०२०) २५६२ १३९८
Website: www.unipune.ac.in

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune – 411 007
Telephone: (020) 2562 1398
E-mail: coe@unipune.ac.in


**संदर्भ क्र.:** परीक्षा/छा. व ता./१४८६ **दिनांक:**०३/०९/२०२५

प्रति
**मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा व दादरा–नगर हवेली)

**मा. विभागप्रमुख/संचालक,**
सर्व शैक्षणिक विभाग/प्रशाळा,
प्रस्तुत विद्यापीठ

**विषय : सर्व विद्याशाखांच्या सर्व अभ्यासक्रमांशी संबंधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ साठी 'विशेष बाब' म्हणून तात्पुरता प्रवेश सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत......**

संदर्भ : विद्यापीठ परिपत्रक क्र. २०९/२०२५ (जा.क्र. OW/2025/I/5, दि. १४/०८/२०२५)

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय परिपत्रकान्वये सर्व विद्याशाखेअंतर्गत सर्व अभ्यासक्रमांच्या प्रथम/द्वितीय/तृतीय वर्षासाठी केवळ शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ मधील हिवाळी सत्र (ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२४) आणि उन्हाळी सत्र (एप्रिल/मे २०२५) परीक्षेत जे विद्यार्थी प्रथम/द्वितीय/तृतीय वर्षातील अनुशेष कायम राहिल्याने अनुक्रमे तृतीय/चतुर्थ/पाचव्या वर्षात प्रवेश घेण्यास पात्र नाहीत, अशा संबंधित विद्यार्थ्यांना अनुक्रमे प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणा–या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्राकरिता, द्वितीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणा–या विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षाच्या सातव्या सत्राकरिता, तृतीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणा–या विद्यार्थ्यांना पाचव्या वर्षाच्या नवव्या सत्राकरिता तात्पुरता प्रवेश तसेच वरील वर्गात तात्पुरता प्रवेश देण्याची पात्रता ही सम सत्र २०२४–२०२५ च्या (म्हणजेच उन्हाळी सत्र परीक्षा २०२४–२०२५) परीक्षांच्या निकालाऐवजी विषम सत्र २०२५–२०२६ च्या (म्हणजे हिवाळी सत्र परीक्षा २०२५–२०२६) निकालांवर ठरविण्यात आलेली आहे.

याबाबत आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रकाच्या अनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी तात्पुरता प्रवेश संधी अंतर्गत संबंधित वर्गात दिनांक १४/०८/२०२५ ते दिनांक ०२/०९/२०२५ या कालावधीत तात्पुरता प्रवेश दिल्याचे महाविद्यालय/ परिसंस्थेचे पत्र संदर्भीय परिपत्रकामधील तरतूदींच्या अनुषंगानेच पात्र विद्यार्थ्यांचे सोबत जोडलेल्या नमुन्यातील हमीपत्र हे दिनांक ०३/०९/२०२५ ते १०/०९/२०२५ या कालावधीत https://examinward.unipune.ac.in/ExamformOnline/auth/login_college.aspx या लिंकवर भरण्यात यावे. जेणेकरुन संबंधित पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरताना समस्या निर्माण होणार नाही.

<u>खालील तक्त्यानुसार विद्यार्थी पात्र राहतील.</u>

**अ) प्रथम वर्ष ते तृतीय वर्ष :**

| **प्रथम वर्ष (First Year)** | **द्वितीय वर्ष (Second Year)** | **तृतीय वर्ष (Third Year)** |
|---|---|---|
| हिवाळी सत्र (ऑक्टोबर/नोव्हेंबर) २०२४ आणि/किंवा उन्हाळी सत्र (एप्रिल/मे) २०२५ या परीक्षेत नापास परंतु पुढील सत्रात जाण्याची परवानगी (Fail ATKT) | द्वितीय वर्षातील हिवाळी सत्र (ऑक्टोबर/नोव्हेंबर) २०२४ आणि उन्हाळी सत्र (एप्रिल/मे) २०२५ या परीक्षेत किमान ५० टक्के श्रेयांक प्राप्त किंवा ज्या अभ्यासक्रमांचे निकाल टक्केवारी (Percentage) पद्धतीने लागत असतील त्यांना अभ्यासक्रमनिहाय ATKT च्या नियमांप्रमाणे ATKT असल्यास | उन्हाळी सत्र (एप्रिल/मे) २०२६ या परीक्षेवेळी सत्र ५ व ६ च्या सत्रांत परीक्षा एकत्रित देण्यासाठीच्या तात्पुरत्या प्रवेशास पात्र. |

...२/–

ब) द्वितीय वर्ष ते चतुर्थ वर्ष :

| द्वितीय वर्ष (Second Year) | तृतीय वर्ष (Third Year) | चतुर्थ वर्ष (Fourth Year) |
|---|---|---|
| हिवाळी सत्र (ऑक्टोबर/नोव्हेंबर) २०२४ आणि/किंवा उन्हाळी सत्र (एप्रिल/मे) २०२५ या परीक्षेत नापास परंतु पुढील सत्रात जाण्याची परवानगी (Fail ATKT) | तृतीय वर्षातील हिवाळी सत्र (ऑक्टोबर/नोव्हेंबर) २०२४ आणि उन्हाळी सत्र (एप्रिल/मे) २०२५ या परीक्षेत किमान ५० टक्के श्रेयांक प्राप्त किंवा ज्या अभ्यासक्रमांचे निकाल टक्केवारी (Percentage) पद्धतीने लागत असतील त्यांना अभ्यासक्रमनिहाय ATKT च्या नियमांप्रमाणे ATKT असल्यास | उन्हाळी सत्र (एप्रिल/मे) २०२६ या परीक्षेवेळी सत्र ७ व ८ च्या सत्रांत परीक्षा एकत्रित देण्यासाठीच्या तात्पुरत्या प्रवेशास पात्र. |

क) तृतीय वर्ष ते पाचवे वर्ष :

| तृतीय वर्ष (Third Year) | चतुर्थ वर्ष (Fourth Year) | पाचवे वर्ष (Fifth Year) |
|---|---|---|
| हिवाळी सत्र (ऑक्टोबर/नोव्हेंबर) २०२४ आणि/किंवा उन्हाळी सत्र (एप्रिल/मे) २०२५ या परीक्षेत नापास परंतु पुढील सत्रात जाण्याची परवानगी (Fail ATKT) | चतुर्थ वर्षातील हिवाळी सत्र (ऑक्टोबर/नोव्हेंबर) २०२४ आणि उन्हाळी सत्र (एप्रिल/मे) २०२५ या परीक्षेत किमान ५० टक्के श्रेयांक प्राप्त किंवा ज्या अभ्यासक्रमांचे निकाल टक्केवारी (Percentage) पद्धतीने लागत असतील त्यांना अभ्यासक्रमनिहाय ATKT च्या नियमांप्रमाणे ATKT असल्यास | उन्हाळी सत्र (एप्रिल/मे) २०२६ या परीक्षेवेळी सत्र ९ व १० च्या सत्रांत परीक्षा एकत्रित देण्यासाठीच्या तात्पुरत्या प्रवेशास पात्र. |

१. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये संदर्भिय परिपत्रक क्रमांक २०९/२०२५ नुसार जे विद्यार्थी तृतीय/चतुर्थ/पाचव्या वर्षामध्ये प्रवेश घेण्यास पात्र आहेत अशा तात्पुरता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबी उदा. अध्ययन, अध्यापन, प्रात्यक्षिके, सत्रकार्य, क्षेत्रभेट व इतर बाबी महाविद्यालयाने इतर नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे पूर्ण करुन घ्याव्यात.
२. हिवाळी सत्र २०२५–२६ या परीक्षेमध्ये प्रथम/द्वितीय/तृतीय वर्षातील अनुशेषाचे विषय पूर्णतः उत्तीर्ण होतील असेच विद्यार्थी तृतीय/चतुर्थ/पाचव्या वर्षामध्ये प्रवेश घेण्यास पात्र ठरतील.
३. अनुक्रमांक २ नुसार पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचीच त्यांनी तात्पुरता प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक वर्षातील सत्र ५/७/९ मधील अध्ययन, अध्यापन, प्रात्यक्षिके, सत्रकार्य, क्षेत्रभेट इत्यादी अंतर्गत परीक्षेमधील संपादणूक ग्राह्य धरण्यात येईल.
४. अनुक्रमांक २ नुसार पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची सत्र ६/८/१० मधील अध्ययन, अध्यापन, प्रात्यक्षिके, सत्रकार्य, क्षेत्रभेट इत्यादी अंतर्गत परीक्षेमधील संपादणूक निर्धारित शैक्षणिक वेळापत्रकाप्रमाणे होईल.
५. अनुक्रमांक १ नुसार पात्र ठरणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबी उदा. अध्ययन, अध्यापन, प्रात्यक्षिके, सत्रकार्य, क्षेत्रभेट व इतर बाबी महाविद्यालयाने इतर नियमित विद्यार्थ्यांसोबत पूर्ण करता आलेल्या नाहीत त्या विद्यार्थ्यांच्या अंतर्गत मूल्यमापन परीक्षा व इतर बाबींच्या सर्व संपादणूकीसाठी स्वतंत्र वेळापत्रक जाहीर करण्यात येईल किंवा याबाबतचे निर्देश स्वतंत्रपणे देण्यात येतील.

वरीलप्रमाणे तात्पुरता प्रवेश संधी ही 'विशेष बाब' म्हणून अपवादात्मक परिस्थितीमध्ये केवळ शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ करिताच लागू राहील आणि या निर्देशांचा संदर्भ पुढील शैक्षणिक वर्षामध्ये घेता येणार नाही. उपरोक्त प्रमाणे महाविद्यालयाने तात्पुरता प्रवेश देताना निर्धारित पात्रता पूर्ण केल्याची खातरजमा करावी, पात्रता नसताना महाविद्यालयाने तात्पुरता प्रवेश दिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयाची राहील. तसेच कोणताही पात्र विद्यार्थी तात्पुरता प्रवेश संधीपासून वंचित राहणार नाही, याची संपूर्ण दक्षता घ्यावी.

कळावे,

आपला,

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत : वरीलप्रमाणे.